# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः 04.10.2023** **वारःबुधवार**

---

**ठळक बातम्या**

1. तेलंगण आणि छत्तीसगडमध्ये पंतप्रधानांच्या हस्ते विविध प्रकल्पांचं लोकार्पण आणि पायाभरणी
2. आयुष्मान भव मोहिमेअंतर्गत आता पर्यंत सुमारे 64 हजार लोकांनी घेतली अवयव दानाची शपथ
3. देशविरोधी कृत्य केल्याबद्दल केंद्र सरकारची एनएलएफटी आणि एटीटीएफ या संघटनांवर बंदी

आणि

4. आशियाई क्रीडा स्पर्धेत, तीरंदाजीमध्ये, ओजस देवतळे आणि ज्योती वेन्नम या जोडीला सुवर्णपदक.

**मोदी**

तेलंगणमधील निजमाबाद इथ काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते 8 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या विविध प्रकल्पांचं लोकार्पण आणि पायाभरणीचा कार्यक्रम झाला. त्यांनी काल मनोहराबाद ते सिद्धीपेट, या नव्या रेल्वे मार्गाचं लोकार्पण केल, तसंच धर्माबाद ते मनोहराबाद आणि मेहबूबनगर ते कुंनूल या रेल्वे मार्गाच्या विद्युतीकरणाच उद्घाटन केल . पंतप्रधानानी काल रामागुंडममधे राष्ट्रीय औष्णिक विद्युत महामंडळाच्या तेंलगणा सुपरथर्मल पॉवरप्रोजेक्टच्या पहिल्या टप्प्यातलं 800 मेगावॅटचं पहिलं एककही राष्ट्राला समर्पित केलं. या प्रकल्पातुन तेलंगण राज्याला लागणारी 85 टक्के वीजनिर्मिती करण्यात येणार असून , त्यामुळे राज्यातील उत्तर आणि दक्षिण विजनिर्मिती प्रकल्पाच्यामध्ये ताळमेळ बसण्यात सुधारणा होऊ शकेल . यावेळी बोलताना पंतप्रधान म्हणाले की पेडापल्ली इथ उभारण्यात आलेला हा नवीन प्रकल्प देशातील सर्वात अत्याधुनिक तंत्रज्ञानाने युक्त असून लवकरच अशा प्रकारचा वीज निर्मिती प्रकल्प दुसऱ्या टप्प्यात देशात उभारण्यात येईल.

**मोदी छत्तीसगड**

छत्तीसगड मधल्या जगदलपुर इथ काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते 27 हजार कोटी रुपये खर्चाच्या विविध विकासकामांची पायाभरणी करण्यात आली. छत्तीसगड मधील आदिवासी बहुल बस्तर इथल्या विभागीय कार्यालयात आयोजित समारंभात बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले की विकसित भारताच स्वप्न साकार करण्यासाठी देशातील प्रत्येक राज्य, प्रत्येक जिल्हा आणि प्रत्येक गावाचा विकास झाला पाहिजे. देशातील सर्व साधनसंपत्तीवर गरिबांचा पहिला अधिकार असून, कोणतीही जात आणि धर्म भेद न करता सरकार त्यांच्या सर्वांगीण कल्याणासाठी कटिबद्ध आहे अस ही मोदी यांनी सांगितल.

**स्वनिधी**

शहरातील रस्त्यांवर व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांसाठी केंद्र सरकारने सुरू केलेली आत्मनिर्भर निधी आणि पी एम स्वनिधी योजनेचा लाभ आतापर्यंत देशातल्या 50 लाखांपेक्षा जास्त फेरीवल्यांना झाला आहे. पी एम स्वनिधी योजना 1 जून 2020 रोजी सरकारने सुरू केली होती. ही योजना म्हणजे सूक्ष्म कर्ज योजना असून, याद्वारे शहरातील फेरीवाल्यांना विनातारण 50 हजारांपर्यंत कर्ज दिल जात.

**आयुष्मान भव**

गेल्या महिन्यात सुरु झालेल्या आयुष्मान भव मोहिमेअंतर्गत आता पर्यंत सुमारे 64 हजार लोकांनी आपले अवयव दान करण्याची शपथ घेतली आहे. ही मोहीम 17 सप्टेंबर ते 2 ऑक्टोबर या कालावधीत 'सेवा पंधरवडा ' म्हणून राबवली गेली. केंद्रीय आरोग्य मंत्री मनसुख मांडविय यांनीही अवयवदानासाठी नोंदणी केली आहे. याबाबतची माहिती देताना मनसुख मांडविय यांनी काल सांगितल की आयुष्मान भव मोहीम अतिशय यशस्वी झाली असून, त्याला नागरिकांचा भरभरून प्रतिसाद मिळाला आहे. या मोहिमेअंतर्गत सुमारे 2 लाख 70 हजार आरोग्य मेळावे आयोजित केले गेले. यामध्ये एक कोटी 61 लाखांहून अधिक लोकांनी लाभ घेतल्याची माहिती त्यांनी दिली. या मेळाव्यानद्वारे सुमारे 64 लाख आयुषमान कार्ड काढण्यात आली आणि 1 कोटीहून अधिक आभा कार्डस तयार करण्यात आली. तसंच या मोहिमेत 14 हजार 157 रक्तदान शिबिरे घेण्यात आली, त्यामध्ये सुमारे दोन लाख 28 हजार युनिटस रक्त संकलित करण्यात आलं आहे.

**बंदी**

केंद्र सरकारने काल ईशान्येकडील राज्यातल्या नॅशनल लिबरेशन फ्रंट ऑफ त्रिपुरा अर्थात एनएलएफटी, आणि ऑल त्रिपुरा टाइगर फोर्स अर्थात एटीटीएफ या दोन संघटनांवर देशविरोधी आणि बेकायदेशीर कृत्य केल्याबद्दल बंदी घातली आहे. ही बंदी पाच वर्षांसाठी असेल. याबाबत गृहमंत्रालयाने जारी केलेल्या अधिसूचनेत म्हंटल आहे की या दोन्ही संघटना आणि त्यांच्याशी संबंधित गट करत असलेल्या कारवाया बेकायदेशीर आणि देशाच्या अखंडतेला आणि सर्वभौमत्वाला बाधा आणणाऱ्या आहेत.

**भूकंप**

नेपाळमध्ये काल झालेल्या दोन भूकंपांमुळे राजधानी दिल्लीसह देशाच्या उत्तर भागाला मोठे हादरे बसले. या भूकंपांची तीव्रता 4 पूर्णांक 6 दशांश आणि 6 पूर्णांक 2 दशांश रिख्टर इतकी होती. त्याचा केंद्रबिंदू नेपाळमध्ये जमिनीखाली 5 किलोमीटरवर होता अशी माहिती राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्रानं दिली. यापैकी पहिला भूकंप काल दुपारी सव्वा दोन वाजता, आणि दुसरा भूकंप दुपारी 2 वाजून 51 मिनिटांनी झाला. यामध्ये कोणतीही हानी झाल्याचं वृत्त नाही.

**नोबेल पुरस्कार**

प्रकाशाच्या अॅटोसेकंद प्लसविषयी केलेल्या संशोधनासाठी ३ शास्त्रज्ञांना यंदाचा भौतिकशास्त्रातला नोबेल पुरस्कार जाहीर झाला आहे. अमेरिकेचे पियरे अगोस्टिनी, जर्मनीचे फेरेंक क्रॉझ आणि स्वीडनचे अॅन ल्युलिअर या शास्त्रज्ञांना हा पुरस्कार मिळाला आहे. स्वीडनच्या रॉयल स्वीडिश अकादमी ऑफ सायन्सेस संस्थेने काल या पुरस्काराची घोषणा केली. अत्यंत वेगवान प्रक्रिया मोजण्यासाठी प्रकाशाच्या एककाचे लहान प्लस निर्माण करण्याचा मार्ग त्यांनी या प्रयोगातून दाखवला आहे.

**ऑस्ट्रेलिया-सार्वमत**

ऑस्ट्रेलियामध्ये देशातील मूळ निवासी नागरिकांना ओळख मिळवून देण्याकरता घटनेत दुरुस्ती करण्याबाबतचं मतदान सुरू झालं आहे. येत्या 14 ऑक्टोबर रोजी बहुतांश ऑस्ट्रेलियन नागरिक यासाठी मतदान करतील. यादिवशी मतदान करणं शक्य नसलेल्या नागरिकांना आजपासून देशभरातल्या निवडक मतदान केंद्रांवर मतदान करता येणार आहे. देशातल्या मूळ निवासी नागरिकांसोबत कधीही कुठलाही करार न केलेला ऑस्ट्रेलिया हा राष्ट्रकुल समुहातील एकमेव देश आहे. ऑस्ट्रेलियात घटनेत कोणतीही सुधारणा करायची असल्यास सार्वमत घेणं आवश्यक आहे.

**सिंगापूर**

सिंगापुरमध्ये उघडकीला आलेल्या सर्वात मोठ्या आर्थिक अफरातफर प्रकरणी अजून काही व्यक्तिंना अटक होऊ शकते असं सिंगापूरच्या गृहमंत्री जोसेफिन टीओ यांनी काल संसदेत सांगितल. तसच याबाबत आतापर्यंत जप्त केलेल्या 2 अब्ज डॉलर्स संपत्तिमध्ये ही वाढ होऊ शकते. यासंदर्भात सिंगापूर सरकारने ऑगस्ट महिन्यात विविध ठिकाणी छापेमारी करून 10 परदेशी नागरिकांना अटक केली होती त्यांच्या कडून संपत्ति, मोठ्या गाड्या, सोन्याचे बार, नक्षीकाम केलेल्या पिशव्या आदि समान जप्त केल. टीओ  यांनी सांगितल की सिंगापूर मध्ये याबाबतचे सर्व कायदे कडक असूनही एवढ मोठं आर्थिक अफरातफरीचं प्रकरण उघडकीला आलं हे आपल्यासाठी मोठं उदाहरण असून, याबाबत सखोल चौकशी करण्यासाठी आंतर मंत्रालय समिति स्थापन केली जाईल.

**मंत्रिमंडळनिर्णय**

राज्यातल्या शिधापत्रिकाधारकांना या वर्षी दिवाळीनिमित्त शंभर रुपयात ‘आनंदाचा शिधा’ वाटप करण्यात येईल अशी घोषणा काल झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत करण्यात आली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे या बैठकीच्या अध्यक्षथानी होते. आनंदाचा शिधा या संचात पूर्वी, रवा, चणाडाळ, साखर आणि खाद्य तेल असे 4 जिन्नस होते. आता यामध्ये मैदा आणि पोहे हे दोन नवीन जिन्नसही दिले जाणार आहेत.अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकरीता परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजनेची घोषणा या बैठकीत करण्यात आली. याकरिता 10 कोटी 80 लाख रुपयांच्या खर्चाला या मंत्रिमंडळ बैठकीत  मंजुरी देण्यात आली.राज्यातील नऊ जिल्ह्यांमध्ये सोयाबीन पिकावर पिवळा मोझॅक या विषाणूजन्य रोगाचा  आणि खोडकूज, मूळकूज या बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव झाला असून  कृषी विभाग तसंच मदत आणि  पुनर्वसन विभागांनी संयुक्तपणे तातडीने सोयाबीन पिकांचे पंचनामे सुरू करावेत, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत दिले.

**फसवणूक**

बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर शहरातील एका व्यक्तीची ऑनलाइन पद्धतीने 62 लाख रुपयांची फसवणूक करणाऱ्या दोन नायजेरियन आरोपींना बुलढाणा सायबर सेल पोलिसांनी दिल्ली इथून अटक केली आहे. फेसबुकवरून एका महिलेची मैत्रीची विनंती आल्यानंतर  दिल्लीला भेटवस्तू पाठवत असल्याचं सांगून वेळोवेळी त्यांच्याकडून 62 लाख रुपये विविध खात्यांवर पाठवायला सांगून त्यांची फसवणूक केली.

**आशियाई-स्पर्धा**

आशियाई क्रीडा स्पर्धेत तीरंदाजीमध्ये मिश्र दुहेरी प्रकारात ओजस देवतळे आणि ज्योती वेन्नम या जोडीनं सुवर्णपदक पटकावलं. या सुवर्णपदकासह भारताच्या खात्यात 71 पदकं जमा झाली आहेत. ही भारताची आशियाई क्रीडा स्पर्धेतली आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी आहे. याआधी जकार्ता इथं झालेल्या स्पर्धेत भारताला 69 पदकं मिळाली होती. स्पर्धेच्या आजच्या दिवसाची सुरुवात राम बाबू आणि मंजू राणी यांनी 35 किलोमीटर चालण्याच्या मिश्र प्रकारच्या स्पर्धेत मिळवलेल्या कांस्यपदकानं झाली.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल, नमस्कार.**